VOL- IX ISSUE- XII DECEMBER 2022 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.331 ISSN 2349-638x

# भूमिकापालन प्रतिमान एक अध्यापन प्रतिमान

संशोधक
**श्री धनंजय जगन्नाथ भांडवलकर**
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा
विद्यापीठ, नांदेड

मार्गदर्शक
**डॉ. डी. एम. मुगले**
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा
विद्यापीठ, नांदेड

**प्रस्तावना –**

अध्यापनाच्या वेगवेगळ्या पद्धती व तंत्र आपल्याला माहिती आहेत. अध्यापनाचा मुख्य उद्धेश अध्ययन सुलभ झाले पाहिजे. विद्यार्थ्याच्या लक्षात राहिले पाहिजे, आकलन झाले पाहिजे. अध्ययन सुलभ होण्यासाठी शिक्षक वेगवेगळ्या पद्धतीचा वापर करतात. या पद्धतीचा वापर करताना कोणतीही एखादी पद्धती अतिशय उपयुक्त आहे असे दिसून येत नाही. अध्ययनाच्या उपपत्ती व सिद्धांत याचा ताळमेळ दिसून येत नाही. म्हणून शिक्षण तज्ञांनी अध्ययनाच्या उपपत्ती व पद्धतीची सांगड घालून अध्यापनाची प्रतिमाने तयार केली.

**पाश्वभूमी –**

विविध क्षेत्रामधील परीक्षणे मानसशास्त्रीय व सामाजिक उपपत्तीचा अभ्यास करून बुस जॉयस व मार्शा वील यांनी प्रतिमाने मांडली.

**अध्यापन प्रतिमानाची आवश्यकता**

१) प्रभावी अध्यापन करण्यासाठी
२) उद्देश केंद्री अध्यापन करण्यासाठी
३) अध्यापनासाठी योग्य वातावरण तयार करण्यासाठी

**अध्यापन प्रतिमान –**

- वर्गातील अध्यापन व अध्यापनासाठी वापरले जाणारे साहित्य यांचे नियोजन करण्यासाठी वापरला जाणारा आराखडा म्हणजे अध्यापन प्रतिमान
- सुस्थिर तत्वाद्वारे विद्यार्थी व शिक्षक यांनी परस्पर सहकार्याने वर्गामध्ये तयार केलेले वातावरण म्हणजे अध्यापन प्रतिमान.
- वर्गामध्ये किंवा अन्य परिस्थितीत अध्यापनासाठी मार्गदर्शन करू शकणारा आकृतीबंध किंवा आराखडा म्हणजे अध्यापन प्रतिमान.
- अध्यापनाचा आराखडा म्हणजे अध्यापन प्रतिमान परस्पर संबंध किंवा प्रक्रिया यांना एकाच स्थितीतून ज्या स्थितीत चांगल्या अभ्यासता येतील त्या स्थितीत येण्यासाठी वापरले जाणारे साधन म्हणजे प्रतिमान होय.

'A model of teaching is a plan or pattern that can be used to shape curriculum to design instructional material and to guide instruction in the classroom into other settings'

- एस.एन. गेज – 'अध्यापनाचे प्रतिमान म्हणजे अध्यापन विषयक विचारांची पद्धती किंवा संशोधनाचा आकृतीबंध होय'
- ब्रुस जॉईस – 'अध्यापन प्रतिमाने ही केवळ प्रारूपे आहेत ही प्रारूपे विद्यार्थ्यांच्या वर्तमानात बदल घडवून आणण्यासाठी आवश्यक ती परिस्थिती निर्माण करण्याच्या प्रक्रियेचे वर्णन करतात.'
- ब्रुस जॉईस व मार्था बिल – 'अध्यापनाचे प्रतिमान म्हणजे एक अशा प्रकारचे नियोजन किंवा नमुना की ज्याद्वारे अभ्यासक्रमाची रचना करता येते, ज्याद्वारे ज्ञानाधारित साहित्य तयार करता येते आणि ज्यातून वर्गात अन्य परिस्थितीत अध्यापनासाठी मार्गदर्शन करता येते.

**अध्यापन प्रतीमानाची वैशिष्टे**

१) अध्यापनाचे प्रतिमान हा एक आराखडा आहे.
२) प्रत्येक प्रतीमानाची विशिष्ट रचना असते.
३) प्रत्येक प्रतिमान विशिष्ट उद्धिष्टावर आधारित असते.
४) उद्धिष्टाला अनुसरून शैक्षणिक साधने व अध्यापन कौशल्ये यांची योजना केलेली असते.
५) प्रत्येक प्रतीमानात शिक्षक व विद्यार्थी याच्या भूमिका स्वतंत्र असतात.
६) प्रतीमानात लवचिकता असते.
७) विशिष्ट क्रमाने येणाऱ्या पायऱ्या व त्यानुसार कृती याचा आराखडा असतो.

**अध्यापन प्रतीमानाचे वर्गीकरण –**

अध्यापन प्रतीमानाचे चार गटात वर्गीकरण केले जाते.

- ज्ञान प्रक्रीयाकरण प्रतिमाने
- व्यक्तिगत विकास प्रतिमाने
- सामाजिक आंतरक्रिया प्रतिमाने
- वर्तन परिवर्तन प्रतिमाने

**१) ज्ञान प्रक्रीयाकरण प्रतिमाने**

ज्ञानात्मक वैचारिक व बौद्धिक अंगांचा विकास घडवून आणणे ह्या या प्रतिमानाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. ज्ञान प्रक्रियाकरणात मात्र परिस्थिती किंवा साधनांच्या माध्यमातून माहिती किंवा ज्ञानकण गोळा करण्याचे व संग्रहित करण्याचे कौशल्य, प्राप्त माहितीचे किंवा ज्ञानाचे विश्लेषण व वर्गीकरण करून त्यातून संकल्पना विकसित करण्याची क्षमता, समस्यांचा शोध घेऊन त्याचे निराकरण करण्याची क्षमता, उदगामी व अवगामी विचार प्रक्रियेची क्षमता इत्यादींचा समावेश होतो

**२) व्यक्तिगत विकास प्रतिमाने**

प्रत्येक विद्यार्थ्याची काही व्यक्तीवैशिष्ट्ये असतात. काही सुप्त शक्ती असतात. त्यांचा शोध घेऊन विकास करणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट ! विकासाचे हे अंग प्रामुख्याने मानवाधीस्ठीत असते. विद्यार्थ्यांच्या व्यक्ती वैशिष्ट्यांचा विकास करून त्याचे भावनिक अधिक समृद्ध करणे व त्याद्वारे सामाजिक वातावरण व एकूण पर्यावरणाशी सर्जनशील संबंध प्रस्थापित करण्यास त्यांना मदत करणे हे या गटातील प्रतिमानाचे लक्ष !

**३) सामाजिक आंतरक्रिया प्रतिमाने**

विद्यार्थ्यांचा सामाजिक अंगाचा विकास नागरिकत्वाचा विकास हे आज शिक्षणाचे महत्त्वाचे उद्दिष्ट मानले जात आहे. विद्यार्थ्यांचे शालेय समाजातील इतर व्यक्तींशी योग्य प्रकारचे संबंध प्रस्थापित करण्याची व त्याद्वारे सामाजिक जाणीव, सामाजिक जबाबदारी व लोकशाही मूल्यांचे बिजारोपण करण्याची जबाबदारी शिक्षणावर पडली आहे. सामाजिक आंतरक्रिया प्रतिमाने ही गरज पूर्ण करून हे उद्दिष्ट साध्य करण्याचा प्रयत्न करतात.

**४) वर्तन परिवर्तन प्रतिमाने**

वर्तन परिवर्तन सिद्धांतावर आधारित अध्ययन उपपत्तीनुसार शिक्षणात विद्यार्थ्यांचा बाह्य दृश्य वर्तन परिवर्तन परिवर्तनावर भर दिला जातो अध्ययन अनुभवाची विशिष्ट प्रकारची क्रमबद्ध रचना व प्रबलीकरण प्रक्रिया द्वारा हे वर्तन परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न करणारी प्रतिमाने या गटात मोडतात.

**मुलभूत घटक**

१) संरचना
२) प्रतिक्रियेची तत्वे
३) सामाजिक प्रणाली
४) सहाय्यभूत प्रणाली
५) उद्देशबिंदू

१) **संरचना** – कोणत्याही पद्धतीचा वापर करताना कोणत्याही विशिष्ट क्रमाचा अवलंब करावा लागतो. जुन्या अध्यापन पद्धतीत सर्वस्वी पंचपद्धती वापरली जात असे. हा एक विशिष्ट क्रमच होता. अध्यापनाचा प्रारंभ कसा करायचा, कोणते अनुभव आधी घ्यावयाचे, कोणते नंतर घ्यावयाचे हे आधी ठरवणे आवश्यक आहे. रूढ भाषेत यालाच आपण पाठच्या पायऱ्या म्हणतो. क्रमान्वित अध्ययनात जो क्रम पाळला जातो. त्याला ओघ तक्ता म्हणतात. प्रतीमानात याला अवस्था म्हणतात. प्रत्येक प्रतीमानाची अवस्थाचा क्रम ठरलेला असतो.

२) **प्रतिक्रियेची तत्वे** – विद्यार्थ्याकडून मिळणाऱ्या प्रतिसादाबाबत शिक्षकाच्या प्रतिक्रिया काय असाव्यात, कशा असाव्यात यासबधी मार्गदर्शन करणारी ही प्रतिक्रिया तत्वे. प्रत्येक प्रतीमानात शिक्षकाच्या प्रतीक्रियाचे स्वरूप वेगवेगळे असावे लागते. ज्ञान प्रक्रीयाकरण प्रतीमानात विद्यार्थ्याने दिलेल्या बरोबर उत्तराचा स्वीकार करून त्याला शाबासकी देणे योग्य ठरेल.

३) **सामाजिक प्रणाली** – यात शिक्षक व विध्यार्थी याच्या भूमिका, त्याचे परस्परसंबंध, त्याच्यातील आंतराक्रीयाचे स्वरूप कसे असावे, कोणत्या प्रतीमानात शिक्षकाची कोणती भूमिका योग्य मानवी यासबधीचे मार्गदर्शन असते. आजच्या अध्ययनात शिक्षकाला विविध प्रकारच्या भूमिका वठवाव्या लागतात. एखाद्या प्रतीमानात शिक्षकाला प्राधान्य, त्याने पुढाकार घ्यावा असे अपेक्षित असेल तर दुसऱ्यात विद्यार्थ्यांना अधिक स्वातंत्र्य, त्याच्यावे अधिक जबाबदारी असा पकार राहू शकेल.

४) **सहाय्यभूत प्रणाली** - प्रत्येक प्रतीमानात त्या अनुरूप व आवश्यक अशी काही विशिष्ट प्रकारची कौशल्ये शिक्षकाच्या अंगी असणे आवश्यक असते. पण त्या सोबतच व्यक्तिमत्व, त्याची गुणवैशिष्ट्ये ही देखील अनुरूप असाली पाहिजेत. प्रत्येक प्रतीमानासाठी शिक्षकात विशिष्ट प्रकारच्या गुणवैशिष्ट्याची आवश्यकता तर असतेच पण त्याशिवाय अन्य प्रकारच्या साधन सामग्रीची गरज राहू शकेल. उदा. दृक्श्राव्य साधने, ग्रंथालय, प्रयोगशाळा, कधी कधी विद्यालयीन परिसराबाहेर जाऊन काही विद्यार्थ्यांना अनुभव द्यावे लागतील.

५) **उद्देशबिंदू** - प्रतीमानाच्या उद्धीष्टवर अवलबून असते. उदा. पृच्छा प्रशिक्षणात – समस्येची उकल करणे.

**अग्रत संघटक प्रतिमान** – अर्थपूर्ण माहिती देणे व बोधात्मक सरचना दृढ करणे.

➢ **भूमिकापालन तंत्र प्रतिमान**

उद्गाता फेनी शाफेल व जॉर्ज शाफे

**उद्देशबिंदू**

१) विदयार्थ्यामध्ये वास्तव जीवनातील समस्याची जाणीव निर्माण करणे.

२) विदयार्थ्यांना समस्या सोडविण्यासाठी विविध प्रकारच्या भूमिकांचा परिचय करुन देणे.

३) विदयार्थ्यांना समस्या सोडविण्यास सक्षम करणे.

**संरचना**

याच्या आठ पायर्‍या आहेत.

१) मनोभूमिका तयार करणे.

२) सहभागीची निवड करणे.

३) रंगमंच व्यवस्था करणे.

४) निरीक्षक निवडणे.

५) सादरीकरण.

६) चर्चा व मुल्यमापन

७) पुर्नअभिनय

८) पुर्नचर्चा व पुर्नमुल्यांकन

९) तत्वशोधन

➢ **सामाजिक प्रणाली** –

सुरवातीस शिक्षक प्रमुख भूमिकेत नंतर मार्गदर्शकाच्या भूमिकेत शिक्षक व विद्यार्थी एकाच पातळीवर.

➢ **प्रतिक्रियेची तत्वे** –

१) विद्यार्थ्याच्या सूचना व प्रतीक्रियाचा स्वीकार करणे.

२) प्रतिक्रियांना प्रतिसाद देणे.

➢ **सहाय्यभूत प्रणाली** –

समस्या तयार होणारे प्रसंग, रंगमंचासाठी आवश्यक साहित्य.

**समारोप** –

भूमिका पालन तंत्राचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याचे अध्ययन सुलभ होण्यास मदत होते व लवकर आकलन होते. या पद्धतीमध्ये विद्यार्थ्याच्यसूचना व प्रतीक्रियाचा शिक्षकांनी स्वीकार केल्यामुळे अध्ययन सुलभ होण्यास मदत होते.

**संदर्भ** –

१) अध्यापन शास्त्र आणि पद्धती – डॉ. म. वा. कुंडले

२) अध्यापनाची प्रतिमाने – डॉ. वासंती फडके